# – : डॉ. सुभाष शिवराम एरम यांचा परिचय : –

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | डॉ. सुभाष उर्फ बाळासाहेब शिवराम एरम |
| **पत्ता** | | |
| **निवास** | : | **'शिवांजली'** मंगळवार पेठ, कराड ४१५ ११० <br> जिल्हा : सातारा |
| **हॉस्पीटल** | : | 'शारदा क्लिनिक', मंगळवार पेठ, कराड ४१५ ११०. |
| **बँक** | : | अध्यक्ष दि कराड अर्बन को-ऑप. बँक लि. कराड <br> (शेड्यूल्ड बँक) <br> मुख्य कार्यालय : ५१६/२, शनिवार पेठ कराड ४१५ ११०. |
| **फोन निवास** | : | २२०९९२, २२२९३८ |
| **हॉस्पीटल** | : | २२२४४० |
| **बँक** | : | २२६०१३, २२६०१७ |
| **इ-मेल** | : | www.karadurbanbank.com |
| **फॅक्स** | : | २२०१२६ |

**जन्मस्थळ व तारीख** : पुणे दि. ५ जानेवारी १९५१.

**शिक्षण** :

माध्यमिक शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग, पुणे येथे व त्यानंतर टिळक हायस्कूल कराड येथे माध्यमिक शिक्षण पूर्ण. सायन्स कॉलेज, कराड येथून महाविद्यालयीन शिक्षण. सन १९७३ मध्ये गर्व्हमेंट मेडिकल कॉलेज, मिरज येथे एम.बी.बी.एस. पदवी विशेष गुणवत्तेसह संपादन केली. यानंतर Master of Surgen ही पदवी युनिव्हरसिटी ऑफ बॉम्बे येथून संपादन. FICS(1986), FRSH(1988), FAIMS(1994), FAIS(1994),MNMS(1985) इत्यादी वैद्यकीय क्षेत्रातील पदव्या परदेशामधील युनिव्हरसिटीज् मध्ये शिक्षण घेऊन संपादन केल्या. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगत ज्ञानाची माहिती घेण्यासाठी पुढील अमेरिका, युरोप,जपान, सिंगापूर आणि अफ्रिका या देशांचा प्रवास.

**सध्या भूषवित असलेली पदे**

- निष्णात धन्वंतरी म्हणून प्रसिद्ध.
- Fujinon Japan येथे Medical Consultant म्हणून १९९६ ते २००६ अखेर कार्यरत होते.
- अध्यक्ष, दि कराड अर्बन को-ऑप. बँक लि., कराड (शेड्यूल्ड बँक)

**वैद्यकीय क्षेत्र**

१९७८ साली शारदा क्लिनिकमध्ये वैद्यकीय सेवेस प्रारंभ करून आपल्या वैद्यकीय चिकित्सा – कौशल्याचा आणि ज्ञानाचा फायदा कऱ्हाड तालुक्यातील ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागातील लोकांना करून देऊन त्यांचा दुवा व प्रेम संपादन केले. डॉ. सुभाष एरम यांचे स्वत:चे सर्व अद्यावत सुखसोयींनी सुसज्ज असे पन्नासबेडचे हॉस्पिटल कऱ्हाड येथे असून त्याद्वारे कुटुंब नियोजन व कुटुंब कल्याण, रक्तदान व रक्तपेढी, व्हीडीओ एन्डोस्कोपी आणि नेहमीची वैद्यकीय सेवा ते रूग्णांना देत आहेत.

सन १९९२ मध्ये टोकियो मेडिकल युनिव्हरसिटीच्या इन्फरमेशन मेडिकल कम्युनिकेशन सेंटरची ऐंडोस्कोपी प्रशिक्षणासाठी स्कॉलरशिप मिळाली व सदरचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या सन १९९४ मध्ये पूर्ण केले.

सन १९९६ मध्ये टोकियो मेडिकल युनिव्हरसिटीमधील प्रा.डॉ. दाजी हाशीमोटो यांचेसमवेत लॅप्रोस्कोपिक सर्जरी या विषयावरील जपानी भाषेतील पुस्तक इंग्रजीमध्ये भाषांतरित केले.
सन १९९६ पासून फ्युजिनॉन जपान येथे मेडिकल कन्सलटंट म्हणून कार्यरत आहेत.
याशिवाय जपानी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण.

**कराड अर्बन बँक**

स्व. डॉ. द. शि. एरम (बाबा) हे डॉ.सुभाष एरम यांचे वडील बंधू. त्यांना दि.०८ जानेवारी २००३ रोजी देवाज्ञा झाली. यानंतर दि.०४ फेब्रुवारी २००३ रोजी झालेल्या मा.संचालक मंडळ सभेत त्यांची अध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली. डॉ.सुभाष शिवराम एरम हे सन १९९६ पासून बँकेच्या संचालक मंडळावर कार्यरत आहेत.

आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाची आर्थिक उन्नती साधण्याची आणि मध्यमवर्गाला दिलासा देण्याची त्याचप्रमाणे सुशिक्षित बेकार, अशिक्षित बेकार आणि समाजातील पिडित व शोषित वर्गाच्या उन्नतीसाठी या बँकेच्या माध्यमातून ते कार्यरत आहेत. स्व.डॉ. द.शि. एरम यांनी जनसामान्यांची बँक म्हणून बँकेस नावलौकिक मिळवून दिला. तोच वसा पुढे चालवण्याचे कार्य डॉ.सुभाष एरम करीत आहेत. तसेच, कराड अर्बन बँकेने अर्थकारण करतांना सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजाभिमुख कार्य केले आहे. सध्या बँकेच्या ३८ शाखा असून बँकेने ३५० कोटी ठेवीचे उद्दीष्ठ पार केले आहे. बँकेने १९९१ सालापूर्वीच सर्व शाखांचे संगणकीकरण पूर्ण केलेले आहे. बँकेच्या सर्वांगीण नेत्रदीपक प्रगतीमुळे बँकेस रिझर्व्ह बँकेने दि.२९ जानेवारी २००० रोजी 'शेड्यूल्ड' दर्जा देऊन सन्मानित केले आहे.

## सामाजिक कार्य

### मूक बधिर विद्यालय

मूक बधिर विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी ओळखून १९७७-७८ च्या सुमारास लायन्स क्लब, कराडचे माध्यमातून बहिरेपणा इत्यादी वरील मोफत चिकित्सा व शस्त्रक्रिया शिबीरांचे आयोजन करून अशा विद्यार्थ्यांच्या जीवनास एक नवी दिशा द्यावी आणि समाजामध्ये त्यांना मानाने जगता यावे या विचारातून 'मूकबधिर विद्यालयाची' कल्पना पुढे आली आणि १९८२ साली मूकबधिर शाळा स्व. डॉ. द. शि. एरम यांनी सुरू केली.

आज लायन्स अपंग सहाय्य संस्थेच्या माध्यमातून 'मूक बधिर विद्यालय व वसतिगृह' ही संस्था अतिशय चांगल्या प्रकारे मूकबधिरांना प्रशिक्षित करत आहे. आज या संस्थेत १२० विद्यार्थी शिक्षण घेत असून पैकी ६० विद्यार्थ्यांची वसतिगृहात सोय केली आहे. साऊंड प्रुफ रूम, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह, डायनिंग रूम, रेक्टर निवास, भव्य क्रीडांगण, विविध तांत्रिक कार्यशाळा इ. विविध विभाग अत्याधुनिक साधनसामुग्रीने सज्ज आहेत. मुक्याना वाचा आणि बहिऱ्यांना कान देणारी ही शिक्षणव्यवस्था काळाची मोठी गरज आहे.

या शाळेच्या जडणघडणीमध्ये डॉ.सुभाष शिवराम एरम यांचा अतिशय मोलाचा वाटा आहे. विशेष करून, या मुलांना वैद्यकीय सेवा मोफतपणे गेली अनेक वर्षे ते देत आहेत.

वैद्यकीय क्षेत्रात गेली २५ वर्षे 'शारदा क्लिनिक'च्या माध्यमातून देत असलेल्या वैद्यकीय सेवा/सुविधामुळे एक उत्कृष्ठ धन्वंतरी म्हणून ख्यातकीर्त असलेल्या डॉ.सुभाष (बाळासाहेब) एरम यांनी विविध सार्वजनिक संस्थांच्या माध्यमातून वैद्यकीय मदतीचा हात नेहमीच गरजूंना देऊ केला आहे. आपल्या कार्यकतृत्वाने अर्बन बँकेच्या माध्यमातून कार्य करणारा एक दूरदर्शी अर्थकारणी म्हणून त्यांचेकडे पाहिले जाते.

****